Historicity Research Journal
Volume 1 | Issue 9 | May 2015 ISSN:- 2393-8900

Research Article

आगरी समाजाची संस्कृती

शिलेदार चंद्रकला बसाप्पा

□ला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय,उमदी.

सारांश **:**

भारतीय समाज हा एकसंध व एकजिनसी स्वरुपाचा कधीच नव्हता विविधतेच्या मुळाशी असलेली विषमता हेच आमचे खरे वास्तव आहे. वर्ण व्यवस्थेमुळे भारतीय समाज विविध वर्णात आणि नंतर विविध जाती, उपजातीत विभा□ला गेला. श्रेष्ठ-□निष्ठत्वाची, वेगळेपणाची भावना जोपासत पिढयानपिढया जातीच्या कुंपणात बंदिस्तपणे जाती जगत राहिल्या.

प्रस्तावना :

भारतीय समाजामध्ये ग्रामीण व्यवस्थेत वतनदार, शेतकरी कुणबी, बलुतेदार अलुतेदार व अस्पृश्य हे व□ दिसून येतात. आणि प्रत्येक जाती-जमाती हया आपल्या चालीरिती, रुढी परंपरानुसार त्या स्वतंत्र-तटस्थपणे जगत राहिल्या.

आगरी शब्दाची उत्पत्ती :-

महाराष्ट्रातील एक जात, कोळी समाजातील जी कुंटुंबे मीठ शेतीकडे वळाली त्यातूनच आगरी समाजाचा उदयझाला. आगर या प्राकृत शब्दाचा सरळ अर्थ आहे बाग वा शेत. नारळ पोपळीच्या बागाबरोबरच जेथे मीठ पिकवले जात होते. त्याला अर्थातच मिठाची बाग, मिठागर म्हटले जाते. या आगर शब्दातूनच अगारिया शब्दाचा उगम झाला असल्याचे स्पष्ट दिसते. आगरी लोकांना खारकी, □ारपाटे किंवा आगळे कुणबी अशीही नावे आहेत. शुध्द आगरी व वरप आगरी असे या जातीचे पोटभेद आहेत.

शुध्द आगरी जातीच्या मीठ आगरी, दास आगरी व ढोल आगरी अशा तीन शाखा आहेत. स्वत:ला ढोलआगरी म्ह□वि□रे □ाणीही लोक हल्ली सापडत नाहीत. वरील सर्व आगरी स्वत:ला मीठ आगरी किंवा आगरी असे म्हणवून घेतात. दासआगरी मुख्यत: पालघर तालुका व अलिबाग तालुका येथे आढळतात. तिथे त्याना कराड आगरी असे म्हणतात. वास्तविक ही एक निराळीच जमात असून हे लोक मीठ आगरी लोकांबरोबर रोटीबेटी व्यवहार करीत नाहीत. यांच्या उत्पत्तीसंबंधी पुढील दंतकथा सांगतात.

एका स्त्रीची मुले जगत नव्हती म्हणून तिने महारांच्या देवाला नवस केला की माझे मूल जगले तर, मी डोक्यावर गायीचे हाड व □ानावर लोकरीचे फूल खोवून महारवाडयात प्रवेश करीन या नवसानंतर तिचे मूल जगले. तिने आपला नवस बोलल्याप्रमाणे फेडला. या धर्मबाह्य कृत्याबद्दल लोकांनी तिला जातिबहिष्कृत केले दास आगरी हे तिचेच वंशज होत.

आगरी लोकांच्या पूर्वजांची परंपरागत माहिती मिळते, ती अशी-आगरी लोक रावणाचे गायक-वादक होते या कामगिरीबद्दल बक्षीस म्हणून रावणाने त्यांना पश्चिम किनाऱ्यावरील जमीन दिली. त्यांचे वंशज म्हणजे हल्लीचे आगरी होत. ढोल वाजविणाऱ्या धंदयावरुन पडलेले ढोल आगरी हे नाव या परंपरेचे सूचक आहे. आजूनही बरेच आगरी गायक -वादकाचा धंदा करतात.

वरपआगरी लोकांनी प्रथम ख्रिश्चन धर्म स्वीकारला व नंतर पुन्हा ते हिंदू धर्मात आले. त्यांना मग नवे मराठे असे -नाव मिळाले मीठ आगरी त्यामुळेच यांना हलके मानतात.

इतिहास :-

आगरी मंडळी आपल्या जातीचा इतिहास सांगतात तो असा सुमारे ६०० वर्षापूर्वी अलिबाग तालुक्यात चौल, आवास - सासवणे आणि सागरगड या ठिकाणी तीन लहान राज्ये होती. चौल व आवास येथे हिंदू राज्ये होती. सागरगडावर मात्र दिल्लीच्या बादशहाच्या वतीने एक मुसलमान सरदार राहत होता. व तो दोन्ही हिंदू राजांकडून करभार वसूल □रुन दिल्लीला पाठवीत होता. पुढे सागरगडावरील तो सरदार बलिष्ठ होऊन दिल्लीच्या बादशहाला जुमा-नीसा झाला म्हणून बादशहाने त्याच्या पारिपत्याकरिता एका सरदाराला पाठविले. परंतू तो पराभूत होऊन दिल्लीला परत गेला बादशहाने मग दुसरा सरदार पाठविला व मुंगीपैठणच्या बिंब राजाला त्याला मदत करण्यास विनविले त्याप्रमाणे दोघांनी मिळून गडावरच्या सरदाराला पकडून दिल्लीला पाठविले. बिंब राजा मग मुंगीपैठणला न जाता सागरगडावरच राहू लागला. शेजारची दोन्ही हिंदू राज्ये त्यांनी जिंकली. नंतरच्या शांततेच्या काळात त्याच्या जवळच्या मोठया सैन्याची त्याला गरज नव्हती म्हणून पुरेसे सैन्य जवळ ठेवून बाकीच्यांना त्याने मिठागरे बांधून दिली व जरुर त्या ठिकाणी गावठाणे वसवून तिचे त्यांची वसाहत केली

पुढे हळूहळू मिठागरे व वसाहती वाढत जाऊन आगरी लोकांची वस्ती कुलाबा व ठाणे जिल्हयांतील अलिबाग, पेण, पनवेल, □र्जत रोहे, जंजिरा इथवर समुद्रकिनाऱ्यावर जिथे खारटाणाचा भाग आहे. तिथे व त्याच्या लगतच्या प्रदेशात पसरली याप्रमाणे हाती आलेला मीठ पिकविण्याच्या धंदा या जातीने पिढयानपिढया चालू ठेवला.

मीठ :-

मीठ हा आज सर्वांना अतिपरिचयामुळे अत्यंत सामान्य वाटणारा पदार्थ, पण मिठाखेरीज माणूस जगू शकत नाही. त्यामुळेच मिठाचा शोध हा मानवी संस्कृतीतील सर्वात महत्त्वाचा क्रांतिकारी टप्पा मानला जातो. मनुष्य लाखो वर्षापुर्वी जेव्हा शिकारी मानव होता त्या काळात शरीरातील मिठाची गरज भागविण्यासाठी तो शिकर केलेल्या प्राण्याचे प्रथम रक्त पिऊन शरीरातील मीठाची गरज भागवत असे. अथवा लवणयुक्त माती खात असे पुढे उपलब्ध असेल येथील खनिज मीठ वापरात आणले गेले. अशा मिठाच्या नैसर्गिक खाणी मुळात कमी असल्याने अर्थात ते प्रचंड महाग असे. एके काळी सोन्यापेक्षाही अधिक किंमत मिठाला मिळत असे. मिठामुळे जगात अनेक युध्दे झालेली आहेत. जगातील सर्वात प्राचीन व्यापार हा मिठाचा होता. जगातील व्यापारी व्यापारी मार्ग प्राचीन काळी साल्ट रुटस् (मीठमार्ग) महणून ओळखले जात रोममध्येतर सैनिकांना पगार मिठाच्या रुपातच दिला जात असे. त्यामुळेच आजचा salary हा शब्दही मूळच्या salt पासून तयार झाला आहे. मिठाने खादय संस्कृतीत क्रांती तर घडवलीच; पण मानवी आरोग्यही सुदृढ व्हायला मोलाची मदत झाली. ज्याचे मीठ खाल्ले आहे त्याच्याशी बेइमानी करणे हा नैतिक गुन्हा मानला जाऊ लागला. एवढे मिठाचे सांस्कृतिक महत्त्व वाढले.

मीठ हा नेहमीच जागतीक राजकीय इतिहास व्यापून राहिला आहे. इंग्रज सरकारला हादरवून सोडणारा भारतातील महात्मा □धींचा मिठाचा सत्याग्रह कोण विसरेल ? मिठावर कर बसवला म्हणूनच ! मीठ हे मानवी संस्कृतीच्या अत्यंत प्राथमिक काळात कर बसवले गेलेले एकमेव उत्पादन आहे. मिठाच्या खाणीवर व मिठागरांवर देखरेख करायला लवणाध्यक्षाची नेमणूक कशी करावी याबाबत □ौटिल्याच्या अर्थशास्त्रातही निर्देष आहेत. चीनमध्ये इ.स.पू.च्या तिसऱ्या सहस्त्राकातील मिठावरील व्यापार, कर, मिठाचे प्रकार याबाबत सर्वात प्राचीन लेख मिळतो. याचे कारण म्हणजे मीठ हे त्या काळात गरजेपेक्षा कमी उपलब्ध होते आ□ ज्याचे मिठावर स्वामित्व त्याचे साम्राज्य अशी परिस्थिती होती.

भारतात फार पूर्वी हिमालयाच्या भागात नैसर्गिक खाणीतून मिळणारे मीठ तेवढे माहीत होते. पुढे समुद्राच्या पाण्यापासून मीठ बनवायचा शोध इ.स.पू. च्या ५००० वर्षापूर्वी लागला असे गुजरात येथील ढोलवीरा येथे झालेल्या उत्खननातून दिसते. समुद्राच्या पाण्यापासून निर्माण केले गेले ते सैंधव असे असंख्य उल्लेख आपल्याला आपल्या पुरातन साहित्यांतून आढळतात. अर्थात समुद्राच्या पाण्यापासून मीठ बनवण्याचा शोध मत्स्यमारी करणाऱ्या लोकांनीच लावला. जमिनीवर आलेले समुद्राचे खारे पाणी वाळले की मिठाची स्फटिके मिळतात आणि ते खाद्य संस्कृतीत उपयुक्त ठरते हे निरीक्षण कामी आले आणि मिठाचीच शेती करण्याची पध्दत शोधली गेली. भारतात मिठाचा अमोलिक, सर्व मानवी जीवनाला आवश्यक आणि उपकारक असा शोध भारतीय किनारपट्टीवरील आगरी समाजाने लावला.

ामरचना :-

हल्ली ठाणे जिल्हयातील पालघर पासून तो कुलाबा जिल्हयातील श्रीवर्धनापर्यंत समुद्रकिनाऱ्यावर आगरी लोकांचीच वस्ती आहे. आगरी खेडयांचे वैशिष्टये असे की, त्यात फक्त आगरी लोकांचीच वस्ती असते. इतर जातीचा माणूस त्या खेडयात औषधाला सुद्धा सापडणार नाही.

भातशेतीच्या मध्यभागी उंचवटा असेल तिथे आगरी खेडे वसलेले आहे. सर्वसाधारणपणे एका खेडयात पन्नास ते साठ घरे असतात. मोठया खेडयाचे पाडे नावाचे लहान भाग पाडलेले असतात व एका पाडयात एकाच आडनावाची २४ ते ४० कुंटुंबे राहतात. या खेडयात बहुधा पिण्याच्या पाण्याचा दुष्काळ असतो गावात एक देऊळ असते. तिथे पंचायतीची सभा होते. काही खेडयात पीरही आढळतो. प्रत्येक घर व घरापुढचे अंगण शेणाने सारवून स्वच्छ केलेले असते ; परंतु एकंदरीत खेडे घाणेरडेच असते. त्यामुळे एखादी रोगाची साथ असल्यास तिचा त्वरित फैलाव होतो.

घरे :-

आगरी लोकांची घरे चौकोनी असतात. पुढे उघडी ओटी, नंतर एक मधली खोली, तिच्या एका बाजूला स्वयंपाकघर आणि दुसऱ्या बाजूला कोठीची खोली अशी घराची रचना असते. घराच्या भिंती मातीच्या असून वर गवताचे छप्पर असते. आपल्या शेतात मिळणारे हे साहित्य घेऊनच आगरी माणूस स्वतःचे घर बांधतो.

पोशाख व आहार :-

आगरी लोक वर्णाने काळे असून मजबूत बांध्याचे असतात. एक धोतर, एक किंवा दोन सदरे, एक कब्जा व ांदयावर एक घोंगडी एकढेच त्यांचे पडे असतात. शेकडा नव्वद पुरुषांना ताडीचे वा गावठी दारुचे व्यसन असते. या व्यसनाचा दुष्परिणाम त्यांच्या शरीरावर दिसू लागलेला आहे.

आगरी स्त्री सात किंवा आठ वारी लुगडे गुडघ्यापर्यंत लांब व अंगाबरोबर चापून चोपून नेसते. हल्लीच ती चोळी घालू लागली आहे. घरातील सर्व कामे ती करतेच. शिवाय हंगामाच्या दिवसात शेतातही काम करते. १४ ते १८ या वयात तिचे लग्न होते. हल्ली ाही मुली प्राथमिक शाळेत शिकू लागल्या आहेत. भात, भाकरी, मासे हे आगरी लोकांचे मुख्य अन्न आहे. गणेशचतुर्थी , ारी, दिवाळी, होळी या सणांना ते मोदक, वडे, पुरणपोळी इ. पक्वान्ने करतात.

आगरी लोकांची मातृदेवता :-

आगरी लोकांची भात शेती सर्वस्वी पावसावर अवलंबून असते. त्यामुळे अवर्षण पडल्यास ते पावशी देवीचा उत्सव करतात. हा मूळचा शैव मातृसत्ताक पध्दती पाळणारा समाज आहे. शंकराच्या देवळात एका कोपऱ्यात पावशी देवीची एक मोठी दगड मूर्ती स्थापलेली असते. ती मूर्ती बाहेर काढून एका पालखीत ठेवतात व वाजतगाजत गावातल्या तळयापर्यंत मिरवीत नेतात. अग गावचा पुढारी ती मूर्ती तळयात एका जागी बुडवून ठेवतो. पाऊस सुरु झाला की, मग तिला पुन्हा देवळात आणतात. पुरातन मातृसत्ताक पध्दतीचे अंश आजही आगरी समाजाने जतन केले आहेत. अन्य समाजगटापेक्षा वैदिक संस्कृतीचा पगडा दूर ठेवण्यात त्यांना यश आले ते त्यामुळेच ! त्यांच्या देवता प्रामुख्याने मातृदेवताच असून उदा. एकवीरा, मंबाई गोराई इ. त्यामुळे त्यांच्यात हुंडा देणे-घेणे पूर्णतया अमान्य आहे. एवढेच नव्हे तर समाजाची पंचायत ही फक्त देवीमंदिराससमोरच भरते.

आगरीचा भुताखेतांवर विश्वास आहे. एखादयाला भुताने पछाडले असे वाटले की, भगत व मांत्रिक त्यावर इलाज करण्यासाठी येतात. आगरी लोक मूल जन्माला आल्यावर तिसऱ्या, पाचव्या , सहाव्या व बाराव्या दिवशी सठवाईची पूजा व अन्य संस्कार करतात.

विवाहप्रथा -

मार्गशीर्ष ते वैशाख या महिन्यात आगरी लोक लग्ने करतात. कारण या दिवसात नवीन पिके तयार झालेली असतात व त्यांच्या धान्याच्या कणग्या भरलेल्या असतात. मुलाचे लग्न १८ ते २५ या वयात होते. एकाच आडनावाच्या कुटुंबात विवाह होत नाहीत.

लग्नसमारंभ मुलीच्या घरी होतो. साखरपुडयाने लग्नविधीस प्रारंभ होतो. लग्नसोहळा एकंदर पाच दिवस चालतो व एकामागून एक असे चाळीस विधी त्यात असतात. हे विधी धवलारिणीच्या देखरेखीला चालतात. धवलारीण म्हणजे स्त्री पुरोहित होय. प्रत्येक विधीच्या वेळी ती त्या विधीचे गाणे म्हणते. त्या गाण्यांना धवळे असे नाव आहे. लग्नाच्या स्वयंपाकासाठी लाकडे तोडून आणणे, मसाला कुटणे, भात भरडणे, तांदूळ दळणे, मंडप उभारणे ही सर्व कामे आसपासच्या स्त्रीपुरुषाच्या साहाय्याने करतात.

मंडपदेवता स्थापणे व माळ घालायला लावणे हे दोनच विधी ब्राहमण पुरोहित करतो. बाकीचे सर्व धवलारीण चालविते. तेलवण, गौरन्हाणे, उष्टावळ(घास देणे) सोयरी समजावणे, तोंड धुणे, सुपारी लपविणे, विडया तोडणे, गोंधळ घालणे इ. विधी आगरी लोक करतात. जातीबाहेर लग्न केल्यास त्याला बहिष्कृत व्हावे लागते.

विधवेला विधुराशी पाट लावण्याची मुभा आहे. पण पाट मात्र रात्री बारा वाजल्यावर लावतात. अलिकडे त्यांच्यांतला विधवा एकाकी जीवन घालविणे अधिक पसंत करतात. कारण नवऱ्याबाबतचा त्यांचा अनुभव विशेष असा चांगला नसतो व पुन्हा त्या त्रासात पडण्याची त्यांची इच्छा नसते. आगरी लोकांत लग्न ही फार खर्चाची बाब आहे. कितीही गरीब माणूस असला तरी तो कर्ज काढून लग्नसमारंभाचा थाट करतो. यांच्यात घटस्फोटाची चाल आहे.

देवधर्म :-

आगरी लोक खंडोबा, बहिरी, भवानी, म्हसोबा, पिंपळोबा, पीरसाहेब इ. देवतांना भजतात. शिकलेल्या आगरी कुंटुंबात मात्र यांची जागा राम, विष्णू, गणपती या श्रेष्ठदेवतांनी घेतलेली आहे. हया ग्रामदेवतेला बोकड बळी देतात.

नाचगाणे, कुस्ती खेळणे, बैलगाडयांच्या शर्यती लावणे, भजन करणे ही आगरी लोकांची करमणुकीची साधने होत. □णेशचतुर्थी व शिमगा या दोन सणांना पुरुष नाचतात व गातात. स्त्रियाही गौरीच्या व शिमग्याच्या दिवसांत एकत्र जमून गाणी गातात व नाचतात. त्यांच्या गौरीच्या गाण्याचा एक नमुना पुढील प्रमाणे.

येकच पाय हालवतंय | आपले घोला बोलवतंय
आपला घो लाडका | ओटीत घेतल्या खारका
□ारका लागल्या गोड | जिभला आले फोड
जिभच फोड फुटं नाय | दारचा पावना उठूं नाय

□ाही आगारी मीठ पिकविण व भातशेती करणे याबरोबरच गुलाब, नेवाळी, ॲस्टर, गुलछडी, इत्यादी फुलांच्या बागा व तोंडली, घेवडा, पपई, आंबा इ. फळझाडांची लागवड करतात.

समाजव्यवस्था :-

आगरी लोकांच्या ग्रामपंचायती असून व्यक्तीच्या व समूहाच्या सामाजिक आचाराचे नियम त्या ठरवून देतात. त्याविरुध्द सामाजिक आचाराचे नियम त्या ठरवून देतात. त्याविरुध्द वर्तन करणाऱ्याला लगेच समज दिली जाते. किंवा त्याला दंडही केला जातो. □ाही गावे मिळून एक टप्पा होतो व त्यावर एक सरपंच किंवा मुकादम असतो. तो बहुधा वंशपरंपरागत अधिकारी असतो. त्याच्या अधिकरातील प्रत्येक गावाच्या देखरेखीसाठी तो काही पंच नेमतो. सर्वसाधारणपणे पंच हा वयोवृध्द, अनुभवी व व्यवहारी असतो. □ामपंचायतीचा निकाल मान्य नसल्यास सरपंचाकडे जाता येते. त्याचा निकाल निर्णायक असतो. टप्प्याबाहेरच्या प्रदेशावर सरपंचाचा अधिकार चालत नाही.

आगरी समाजाचे योगदान :-

सातवाहन काळापासून महाराष्ट्राचे लष्करी आरमारही बलाढय बनल्याचे दिसते. यात खरा हातभार कोळी-आगरी लोकांचाच होता. हे आरमार एवढे बलाढय होते की, सातवाहनांनी या आगरी बांधवांच्या मदतीने श्रीलंकेचाही पराभव □रत सत्ता स्थापन केली होती. सातवाहनकालीन व आजच्या मराठीचे मूळ असलेल्या महाराष्ट्री प्राकृताच्या मूळ रुपाला आगरी बांधवानी आपल्या आगरी भाषेत

□टाक्षाने जपलेली दिसते. वैदिकांनी जरी पुढे सिंधुबंदी नामक अत्यंत अनिष्ठ प्रकरण पुढे आणले असले तरी नौकानयन या समाजाने सुरूच ठेवलेले दिसते. त्याचाच उपयोग सोळाव्या शतकात छ. शिवाजी महाराजांना स्वराज्याचे आरमार उभारायला झाला, याचा अर्थ हा समाज वैदिक संस्कृतीच्या प्रभावात कधीच आला नाही. त्यांनी समुदबंदीचा फतवा मान्य केला नाही. पुढे सरखेल कान्होजी आंगऱ्यांच्या रुपाने इतिहासाला एक नायक मिळाला, या समाजाचे युध्दतंत्र त्यांच्या काळात कळसास पोहोचले. समुद्राचीच संगत पूरातन कालापासून असल्याने सागरी किल्ल्यांची संकल्पनाही याच समाजाने खूप आधी विकसित केली होतीच हे आधीचे सागरी किल्ले बनवले गेले ते सा□री चाच्यांना तोंड देण्यासाठी व व्यापारावर नियंत्रण ठेवण्यासाठी त्यांचा उपयोग स्वराज्याला खूप मौलाचा ठरला. पण पुढे नानासाहेब पेशव्याने आंग्रे यांचे आरमार बुडवण्याची घोडचूक केली आणि इंग्रज-पोर्तुगीजांना मोकळे रान मिळाले हा दुर्दैवी इतिहासही येथे विसरुन चालत नाही.

□ोकणात या मानवी गटाचे आगमन इ.स.पू. ७ ते ८ हजार वर्षापूर्वी झाले असावे असे पुरातत्वीय पुराव्यावरुन दिसते. मीठाचा शोध लागल्यानंतर जो भाग मीठशेतीस योग्य आहे तेथेच त्यांची वस्ती आढळणे स्वाभाविक असेच आहे. त्यामुळेच महाराष्ट्रात व □ुजराथेतही त्यांच्या प्राचीन आस्तित्वाचे पुरातत्वीय पुरावे आढळतात आणि तेथेच ते आजही एकवटलेले दिसतात. या समाजात नंतर अनेक जमातीचे लोकही शिरले. त्यामुळे महिकावतीच्या बखरीतील आगरी समाज हा बिंबराजाबरोबर मुं□ी-पैठणवरुन आठशे वर्षापुर्वी □ोकणात आला ही कथा आपोआपच बाद होते. कारण मीठ बनवणे हा आगरी समाजाचा पुरातन कालापासूनचा व्यवसाय होता.

समारोप :-

हा आगरी खरा संशोधक व निमार्णकर्ता समाज होय. मिठाचा इतिहास म्हणजे आगरी समाजाच्या इतिहास होय. या समाजाचा इतिहास वैदिक संस्कृती पेक्षाही पुरातन म्हणजे किमान सात हजार वर्षे एवढा प्राचीन आहे. सर्वानीच त्यांचे मीठ खाल्ले आहेत. इतिहास हा फक्त राजा-महाराजांच्याच नसतो तर ज्यांनी संस्कृती घडवली अशा निर्माणकर्त्यांचाही असतो. हे या निमित्ताने लक्षात येते. अलिकडच्या काळात या समाजाला शिक्षणाचे महत्त्व समजल्याने हळू-हळू शैक्षणिक प्रसार होत असल्याचे दिसते. यामुळे हा समाज जागृत होऊ लागल्याचे दिसून येते.

अशाप्रकारे भारतीय समाजव्यवस्थेतील पशुपालक (धनगर/गवळी) शेतकरी, (आजचे कुणबी) माळी, कोष्टी, सुव□□ार, वीणकर, सुतार, लोहार, चांभार, मांतग, आगरी महार, बुरुड, वडार, ढोर अशा असंख्य समाजधारकांनी खऱ्या अर्थाने नवनिर्मिती केली व समाजाला सेवाही दिल्या . नंदीवाले, वासुदेव, गोंधळी, बहुरुपी, कोल्हारी, आदि भटक्यांनी समाजाच्या मनोरंजनाची ग्वाही दिली तर लमा□-वंजाऱ्यांनी देशव्यापी मालवाहतुकीची जबाबदारी सांभाळली. राजे आले, राजे गेले, जे याच समुदायातून आले होते कधी आपली सत्ता तर कधी परक्यांची यातील जीवन संघर्ष भोगत त्यांनी आपापल्या कुवतीनुसार निर्मिती केली. आज देशातील जी आश्चर्य आहेत त्यामागे यांची प्रतिभा होती त्यांचे विज्ञान होते त्यामुळेच समाज जगला संस्कृती निर्माण करु शकला, पोट भरु शकला, याच निर्माणकत्यांनी संस्कृती घडवली, अर्थव्यवस्थेला खरा आकार दिला-स्वधर्मही जपला यादेशाची संस्कृती घडवण्यात सगळयाचे योगदान महत्वपूर्ण आहे.

संदर्भ

१) जातिसंस्थेचा इतिहास- संजय सोनव□ी, प्राजक्ता प्र□ाशन - पु□े पहिली आवृत्ती : २९ नोव्हेंबर २०१४
२) भारतीय संस्कृती कोश - संपा. पं. महादेवशास्त्री जोशी- भारतीय संस्कृतिकोश मंडळ , पुणे. (खंड प्रथम)
३) भारतीय इतिहास आणि संस्कृती - इतिहास संशोधन मंडळाचे त्रैमासिक - जानेवारी -मार्च २०११
४) महाराष्ट्र समाज आणि संस्कृती - □ुलकर्णी अ.रा.- डायमंड पब्लिकेशन्स पुणे, २००८

शिलेदार चंद्रकला बसाप्पा
□ला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय,उमदी.